**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत स्थापित केलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अंमलबजावणीच्या अधिकारात सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१७/प्र.क्र.५३/पापु-०७**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: ०९ मार्च, २०१८

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दि. २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दि. ३ सप्टेंबर, २००१.
३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दि. २३ मार्च, २००२.
४) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७, दि. २४ नोव्हेंबर, २००६.
५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७, दि. २५ जानेवारी, २००७.
६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/पापु-०७, दि. ४ फेब्रुवारी, २००८.
७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दि. १ ऑगस्ट, २००९.
८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७, दि. ९ सप्टेंबर, २००९.
९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाबाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.
१०) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दि. १७ मार्च, २०१०.
११) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१२२/पापु-०७, दि. १५ मे, २०१०.
१२) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दि.३० ऑगस्ट, २०१०.
१३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र.क्र.९०/पापु-०७, दि. ४ जुन, २०११.
१४) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२१३/प्र.क्र.३५/पापु-०७, दि. १६ जुलै, २०१३.
१५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दि. ९ ऑक्टोबर, २०१३.
१६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.६०/पापु-०७, दि. ०१ जानेवारी, २०१४.
१७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-७, दि. २२ जानेवारी, २०१४.
१८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो १११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दि.९.०७.२०१४.

प्रस्तावना-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारले आहे. सन २००९-१० पासून या कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP) असे करण्यात आले आह. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी संदर्भ क्र.१० व १८ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येते. यानुषंगाने समितीमार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या योजनांची गुणवत्ता, कामाची असमाधानकारक प्रगती व निधीमध्ये अपहार इत्यादी बाबींमुळे योजना प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेता, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस नळ पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती या दोन्ही बाबींचे अधिकार कायम ठेवून अंमलबजावणीचे अधिकार कमी करण्याचे प्रस्तावित होते.

३. वरील परिस्थिती विचारात घेऊन मा.मंत्रिमंडळाच्या दि.२२ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडील नळ पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती हे अधिकार ठेवून अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषदांना देणे, विहित कालावधीत पूर्ण न झालेल्या योजना जिल्हा परिषदांकडे शिल्लक निधीसह वर्ग करणे, विहित केलेल्या कालावधीत योजना समितीमार्फतच पूर्ण करणे यांबाबत शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मा.मंत्रिमंडळाने दि. २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे शासन आदेश पारीत करण्यात येत आहेत.

१) **ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची क्षेत्रिय स्तरावरील अंमलबजावणी-**

संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १८ अनुसार, स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे असलेले रु.२.०० कोटींचे अधिकार रद्द करण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेकडे रु.७.५० कोटींपर्यंतचे असलेले अंमलबजावणीचे अधिकार कमी करुन ते रु.५.०० कोटींपर्यंत करण्यात येत आहेत. तसेच रु.५.०० कोटींवरील अंमलबजावणीचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे सोपविण्यात येत आहेत. यास्तव, सदर अधिकार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असतील.

| **अ. क्र.** | **ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार** | **अंमलबजावणीचे अधिकार** | | |
|---|---|---|---|---|
| | | **ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** | **जिल्हा परिषद** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | निरंक | रु.५.०० कोटींपर्यंत | रु.५.०० कोटीच्या वरील सर्व |

२) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे नळ पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती या दोन्ही बाबींचे अधिकार कायम ठेवण्यात येत आहेत.

३) प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांपैकी ज्या योजनांचा कालावधी निविदा शर्तीनुसार संपुष्टात आलेला आहे अथवा ज्या योजना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित आहेत, अशा योजनांबाबत समितीकडील शिल्लक निधी जिल्हापरिषदेकडे वर्ग करुन सदर योजनांची उर्वरित कामे जिल्हापरिषदेने त्यांच्या स्तरावरुन पूर्ण करावीत.

४) निविदा शर्तीनुसार विहित केलेल्या कालावधीतील प्रगतीपथावरील योजनांची कामे प्राधान्याने समितीमार्फत पूर्ण करण्यात यावीत.

२. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सचिवांनी समितीकडील ज्या योजनांचा कालावधी निविदा शर्तीनुसार संपुष्टात आलेला आहे अथवा ज्या योजना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित आहेत, अशा सर्व योजना शिल्लक निधीसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या हवाली त्वरित करण्यात याव्यात. अशा योजना हस्तांतरीत करताना कोणत्याही अडचणी उद्भवू नयेत, यासाठी समितीच्या सचिवांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून पुढील कार्यवाही करावी. जिल्हा परिषदांकडे वर्ग झालेल्या योजना त्वरेने पूर्ण करण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौ.संदर्भ क्र.७८/ व्यय-३, दि. ३.३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६११५४१००८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.03.12 12:18:51 +05'30'

**( शाम लाल गोयल )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.

८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त (सर्व)
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१३. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१७. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१८. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९. कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२०. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व).
२१. सर्व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या (संचालक,वासो,नवी मुंबई यांच्यामार्फत).
२२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२३. निवडनस्ती (कार्यासन पापु-०७).